मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543



रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
9890879757

वर्ष ७वे | अंक :४४ | रविवार दि.०१ फेब्रुवारी ते शनिवार ०७ फेब्रुवारी २०२६ | किंमत रु. १/- | पृष्ठ : ४

पान २ संपादकीय — अरवली वाचवा!
पान ३ — भारतीय ख्रिश्चन संताला जपानमध्ये ..
पान ४ — पत्नी नगरसेविका, पती कारभारी?

## भाजपचे २३ नगरसेवक होणार बाद?

वसई विरार महानगरपालिका महापौर निवडणूकी आधी मोठा धमाका होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भाजपाच्या तब्बल २३ नगरसेवकांनी निवडणूक लढविताना दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्र पत्रात प्रचंड त्रुटी असल्याचे स्पष्ट झाले आहे. शपथपत्राचा अविभाज्य भाग असलेल्या पडताळणीवर उमेदवारांच्या सहीच नाहीत. त्यामुळे सदर उमेदवारी अर्ज स्वीकारतानाच ते निवडणूक निणय अधिकाऱ्यांनी बाद/अवैध न ठरवता वैध कसे ठरवले? त्यामुळे निवडणूक आयोगाची भूमिकाच संशयास्पद राहिली आहे. निवडणूक प्रक्रियेत नामनिर्देशनपत्र सादर करताना शपथपत्र सर्वांत महत्त्वाचे असून शपथपत्राचा अविभाज्य भाग असलेल्या

पडताळणीवर उमेदवारांच्या सहीच/Deponent's signature नाहीत. पडताळणीवर अभिसाक्षी म्हणजेच उमेदवारांच्या सह्या नाहीत त्यामुळे त्यांनी केलेलं प्रतिज्ञापत्र admit होऊ शकत नाही. त्यामुळेच ते शपथपत्र वैध ठरत नाही. असे असतानाही निवडणूक निणाय अधिकाऱ्याने ते नामनिर्देशनपत्र कोणत्याही हरकती शिवाय फेटाळून, बाद करणे आवश्यक होते. परंतु सरकारचे दबावामुळेच निवडणूक निणय अधिकाऱ्याने सदरचे नामनिर्देशनपत्र अवैध न ठरवता सदरचे अनधिकृत उमेदवार अधिकृत म्हणून निवडणुकीस पात्र ठरवले. निवडणूक आयोगाची ही भूमिका संशयास्पद असून बाबतीत ॲड. प्रविण पाटील ह्यांनी न्यायालयात याचिका दाखल करत सदरच्या उमेदवारांचे उमेदवारी अर्जच अवैध/घटनाबाह्य असून त्या निवडून आलेल्या उमेदवारांचे सदस्यत्व रद्द करण्याची मागणी वरिष्ठ न्यायालयात केली आहे. भाजपच्या नगरसेवकाची यादी

१) रीना उमाकांत वाघ (२अ)
२) सान्वी(अश्रीता) संजोग यंदे (२ ब)
३) रवी श्रीगोपाळ पुरोहित (२क)
४) जितेश हरिश्चंद्र राऊत (२ ड)
५) गौरव वसंत राऊत (५ अ)
६) संजना गणेश भायदे (५ ब)
७) दर्शना अनिल त्रिपाठी (५ क)
८) मेहुल अशोक शहा (५ ड)
९) हितेश नरेंद्र जाधव (६ ड)
१०) नमिता प्रितेश पवार (११ अ)
११) जितेंद्र मनोहर पाटील (११ ब)
१२) रसिका राजेंद्र ढगे (११ क)
१३) मनोज गोपाळ पाटील (११ ड)
१४) मीरा निकम (१६ ब)
१५) बंटी तिवारी (१६ क)
१६) गणेश बाळकृष्ण पाटील (१८ अ)
१७) हेमलता सिंग (१८ ब)
१८) ख्याती संदीप घरत (१८ क)
१९) गंगेश्वरलाल श्रीवास्तव (१८ ड)

पान नं.२वर

## युवाशक्ती कामगार संघटनेला कामगार नेते मिलिंद रानडे यांचा ठाम पाठिंबा; VVCMC ला लवकरच भेट



युवाशक्ती कामगार संघटनेला महाराष्ट्रातील ज्येष्ठ कामगार नेते मा. श्री. मिलिंद रानडे यांचा ठाम व भक्कम पाठिंबा जाहीर झाला आहे.

वसई–विरार शहर महानगरपालिका (VVCMC) हद्दीतील मजुरांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी युवाशक्ती कामगार संघटनेच्या पुढाकाराने लवकरच मा. श्री. मिलिंद रानडे हे न्न्ग्शण ला भेट देणार आहेत.

महानगरपालिकेतील कंत्राटी पद्धतीतील शोषण, वेतन, थकीत देणी, कामाची सुरक्षितता व श्रमकायद्यांची अंमलबजावणी या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. कामगारांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात ठोस भूमिका घेत प्रशासनासमोर प्रश्न मांडले जातील, असे संकेत देण्यात आले आहेत. कामगारांच्या हक्कांसाठीचा लढा अधिक तीव्र केला जाईल, अशी ग्वाही मा. श्री. मिलिंद रानडे यांनी दिली असून, युवाशक्ती कामगार संघटनेच्या या लढ्याला पूर्ण पाठिंबा राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## ३४ कोटींच्या घनकचरा विल्हेवाट घोटाळ्याची चौकशी; स्वराज अभियानाच्या पाठपुराव्याला यश



वसई–विरार शहर महानगरपालिकेतील घनकचरा विल्हेवाट प्रकरणात तब्बल ३४ कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराचा संशय निर्माण झाला असून, या प्रकरणी चौकशी करून संबंधित कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीस स्वराज अभियान यांना यश मिळाले आहे. महापालिकेने मौजे भोयदापाडा व गोखीवरे येथील क्षेपणभूमीवर साचलेल्या कचऱ्याची तसेच दैनंदिन ओला व सुका कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी मे. साई युटिलिटी कॉन्ट्रॅक्टर्स प्रा. लि. या कंत्राटदारास १५ डिसेंबर २०२३ रोजी २० वर्षांचा कार्यादेश दिला होता. मात्र, प्रत्यक्षात कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट न लावता, कोणतीही ठोस खातरजमा न करता महापालिकेने सदर कंत्राटदारास ३४ कोटी रुपयांचे बिल अदा केल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत स्वराज अभियानचे नागरी तक्रार विभाग संयोजक रजनीकांत हरिश्चंद्र पाटील यांनी प्रशासनाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर महापालिका आयुक्त मा. मनोजकुमार सूर्यवंशी यांनी कंत्राटदारास आपले म्हणणे मांडण्याचे निर्देश दिले. या आदेशाला कंत्राटदाराने मा. उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आयुक्तांनी सुनावणी घेऊन दि. ०२ जानेवारी २०२६ रोजी सदर ठेका रद्द केला. तसेच कंत्राटदाराने क्षेपणभूमीवरील कचरा आंध्रप्रदेश, चंद्रपूर व इतर राज्यांतील मे. अल्ट्राटेक सिमेंट व मे. दालमिया भारत सिमेंट लिमिटेड यांना दिल्याचे दाखवून खोटी कागदपत्रे सादर करून ३४ कोटी रुपयांचे बिल उचलले का, याबाबत सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. यासोबतच कंत्राटदाराची संपूर्ण सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणे, निविदेतील अटींचा भंग केल्याबाबत दंड ठोठावून रक्कम वसूल करणे, तसेच यापूर्वी करण्यात आलेल्या कथित बायोमायनिंग कामांचे बिले व कागदपत्रांची पोलिसांमार्फत चौकशी करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. या प्रकरणामुळे महापालिकेतील घनकचरा विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, सार्वजनिक निधीच्या वापरावर कठोर देखरेखीची आवश्यकता असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. स्वराज अभियानाच्या पाठपुराव्यामुळे हा घोटाळा उजेडात आला असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी

पान नं.२वर

# संपादकीय...!

## अरवली वाचवा!

भौतिक विकासाच्या नादी लागून निसर्गाला हवे तसे ओरबाडल्याचे दुष्परिणाम गेल्या काही वर्षांत देशभर दिसत आहेत. भूस्खलनामध्ये गावेच्या गावे गाडली जाण्यापासून महापुरापर्यंत अनेक नैसर्गिक संकटे सातत्याने येत आहेत.दिल्लीपासून सुरू होऊन हरियाणा, राजस्थानमार्गे गुजरातेतील अहमदाबादपर्यंत सुमारे ६७० किलोमीटर क्षेत्रात पसरलेल्या अरवली पर्वतरांगा सध्या चर्चेत आहेत, ते त्याच्या नवीन व्याख्येमुळे. अरवलीच्या क्षेत्रातील किमान शंभर मीटर उंचीचे डोंगर आणि अशा दोन डोंगरांत पाचशे मीटरचे अंतर, अशी नवी व्याख्या करण्यात आल्याने ही अट पूर्ण न करणाऱ्या डोंगरांवर खाणकाम वाढून पर्यावरणाला मोठी हानी पोहोचेल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. भीती व्यक्त करणाऱ्यांत राजकीय नेते असल्याने, त्यांच्याकडे अंगुलिनिर्देश करून त्याकडे राजकारण म्हणून पाहिले जात असले, तरी पर्यावरणवाद्यांकडूनही अतिशय गांभीर्याने हा मुद्दा मांडला जात आहे.ही भीती निराधार असल्याचा खुलासा करून आणि अरवलीच्या एकूण क्षेत्रफळाच्या ०.१९ टक्के क्षेत्रात खाणकाम होणार असल्याचा दावा केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्री भूपेंद्र यादव यांनी केला आहे; परंतु आजवरचा अनुभव पाहता अरवलीच्या क्षेत्राचे नुकसान होण्याची शक्यता अधिक वाटते. बेकायदा खाणकाम यामुळे गेल्या साठ वर्षांत अरवली पर्वतरांगांच्या २५ टक्के भागाची मोठी हानी झाल्याची आकडेवारी दुर्लक्षित करण्यासारखी नाही. अशा खाणकामातून तयार झालेल्या माफियांची ताकदही वाढत गेली आहे. तेव्हापासूनच अरवली वाचविण्यासाठी कार्यकर्ते पुढे सरसावले. परिणामी तिथे खाणकामाला आणि बांधकाम करण्याला १९९५मध्ये बंदी घालण्यात आली. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आणि २००२पासून २०१८पर्यंत विविध खटल्यांद्वारे बंदी कायम राहिली. मात्र, अरवलीला ओरबाडणे थांबले नाही. माफिया आणि हितसंबंधीयांच्या जाळ्याद्वारे बेकायदा खाणकाम कायम राहिले. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने समिती नेमली; अरवलीचा पाव भाग पुरता ओरबाडला गेल्याचे या समितीच्या पाहणीतून समोर आले. यादव यांच्या खुलाशानंतरही अरवलीबद्दल चिंता व्यक्त होत आहे, ती या पार्श्वभूमीवर.अरवली पर्वतरांगांचे महत्त्व या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित करण्याची गरज आहे. देशाच्या वायव्य भागात सुमारे दीड लाख चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेल्या या डोंगररांगा वाळवंटीकरण रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. या डोंगरांच्या पश्चिमेकडील वाळवंट पूर्वेकडे सरकू न देण्याचे मोठे काम त्या करतात. याखेरीज त्यांच्यामुळे भूजल पाणीसाठा वाढतो. शिवाय हवेचे प्रदूषण रोखण्यासही मदत करतात. दर वर्षी नोव्हेंबर आणि डिसेंबर या महिन्यांत दिल्ली आणि परिसरातील हवा विषारी होते. अरवली पर्वतांवरील खाणकाम कायम राहिल्यास ती आणखी विषारी होण्याचा धोका आहे. त्यामुळे अरवली पर्वतरांगांचे सर्वार्थाने आणि सर्व परीने रक्षण करण्याची गरज आहे. मात्र, या पर्वतरांगांच्या ९० टक्के भागाचे रक्षण होणार असल्याची हमी यादव देतात. याचा अर्थ दहा टक्के भागाचे रक्षण होणार नसल्याची कबुलीच ते देतात.केंद्र सरकारने केलेल्या नव्या व्याख्येमुळे, शंभर मीटरहून लहान असलेल्या डोंगरांवर, तसेच दोन डोंगरांमधील अंतर अधिक असलेल्या ठिकाणी खाणकाम होऊ शकते, अशी चिंता पर्यावरणवादी व्यक्त करीत आहेत. मात्र, यादव यांना ही चिंता मान्य नाही. अरवली क्षेत्रात नवीन खाणकामांवर सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली असल्याने तिथे उत्खनन होणार नाही, असा दावा ते करतात. त्यांचे म्हणणे खरे मानले, तरी आपल्याकडे नियमांतून आणि कायद्यातून वाट काढण्याची जी पद्धत रुजली आहे, ती पाहता खाणकाम थांबण्याची शक्यता कमी होते. त्यामुळेच पर्यावरणवाद्यांची चिंता रास्त वाटते. त्यामुळेच अरवली वाचविण्याच्या चळवळीला बळ मिळत आहे.एरव्ही दुष्काळी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागांत मुसळधार पाऊस होण्याचा प्रकार वाढला आहे आणि पावसाळ्यात शहरे पाण्याखाली जाण्याच्या घटनाही वाढल्या आहेत. या सर्वांकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. ही संकटे नैसर्गिक असली, तरी ती मानवनिर्मित आहेत.

पश्चिम घाटापासून पूर्वेकडील पर्वतरांगांपर्यंत आणि अरवलीपासून हिमालयीन पर्वतराजीपर्यंत सर्वच ठिकाणी निसर्गाचे लचके तोडण्याचे काम सुरू आहे. बेकायदा खाणकाम आणि बांधकामे यांमुळे निसर्ग विद्रूप झाला आहे. या साऱ्यांचा अभ्यास करून भविष्यातील संकटांचा इशारा शास्त्रज्ञांनी दिला तरी त्याकडे काणाडोळा करण्याची प्रवृत्ती आपल्याकडे बळावते आहे. अरवली पर्वतरांगांबाबत आज व्यक्त होत असलेली भीती आणि चिंता म्हणजे एक प्रकारे इशाराच. त्यावर खुलासे न करता पर्यावरणाबाबत संवेदनशील होत आणि भविष्याचा विचार करीत सरकारने त्याकडे गांभीर्याने पाहायला हवे.

### भाजपचे २३ नगरसेवक होणार बाद ...पान नं.१

२०) अपर्णा पद्माकर पाटील (२३ अ)
२१) महेश सदाशिव सरवणकर (२३ ब)
२२) निम्मी निपुण दोषी (२३ क)
२३) प्रदीप पवार (२३ ड)

बहुजन आघाडी विरोधात भाजपाने १६ नगरसेवक बाद करण्याबाबत न्यायालयात याचिका दाखल केलेली असताना आता भाजपच्याच तब्बल २३ नगरसेवकांवर पद रद्द होण्याची टांगती तलवार असल्याचे समोर आले आहे.

ॲड. प्रविण पाटील ह्यांनी वसई न्यायालयात याचिका दाखल केली आहे त्यामध्ये उमेदवार, निवडणूक निणाय अधिकारी व राज्य निवडणूक आयोगाला पक्षकार केले आहे.

बाबतीत उच्चन्यायालयाने २०१८ मध्ये अश्याच प्रकरणामध्ये verification/पडताळणी वर उमेदवारांची सही नसल्याचे कारणावरून त्यांचे सदस्यत्व रद्द करणारा ऐतिहासिक निणाय दिलेला आहे. आपला न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास असून ह्या अवैध २३ नगरसेवकांचे सदस्यत्व रद्द होईल ह्यात तिळमात्र शंका नाही असे म्हणत ॲड. प्रविण पाटील ह्यांना ठाम विश्वास व्यक्त केला आहे. त्यामुळे निवडून आलेल्या नगरसेवकांची झोप उडणार हे मात्र निश्चित.

### पत्नी नगरसेविका, पती कारभारी?... पान नं.४,

महापालिकेतील एकूण ११५ जागांपैकी ५८ जागांवर महिला नगरसेविका निवडून आल्या आहेत. महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व सक्षम व्हावे, स्वायत्त नेतृत्व घडावे, यासाठीच आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

निणायामागील हेतू महिलांना स्वतंत्र राजकीय संधी देणे, 'बेनामी सत्ताकेंद्रे' रोखणे, प्रशासनातील पारदर्शकता वाढवणे आणि आरक्षणाचा मूळ उद्देश साध्य करणे, या कारणांसाठी हा निणाय घेण्यात आला आहे.

यंत्रणांचे हात बळकट आयुक्त, विभागप्रमुख आणि दक्षता समित्यांना थेट चौकशी व कारवाईचे अधिकार देण्यात आले आहेत. संशयास्पद प्रकरणांची स्वतःहून दखल घेतली जाऊ शकते. तथ्य आढळल्यास संबंधित नगरसेविकेचे सदस्यत्व धोक्यात येणार आहे.

# अजीव पाटील होणार वसई–विरारचे महापौर

## बहुजन विकास आघाडीकडून नावावर शिक्कामोर्तब; उपमहापौरपदासाठीही अर्ज दाखल

वसई–विरार : वसई–विरार शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत ७१ नगरसेवकांसह निर्विवाद बहुमत मिळवल्यानंतर बहुजन विकास आघाडीने (बविआ) महापौरपदासाठी अनुभवी, शांत आणि संयमी नेते अजीव पाटील यांच्या नावावर अधिकृत शिक्कामोर्तब केले आहे. शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी बहुजन विकास आघाडी आणि भाजप या दोन्ही पक्षांकडून महापौर व उपमहापौरपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.

अजीव पाटील यांच्या नावाबाबत यापूर्वी वर्तवलेले राजकीय भाकीत अखेर खरे ठरले असून, बविआ प्रमुख हितेंद्र ठाकूर यांनी महापालिकेतील राजकीय समन्वयाची महत्त्वाची जबाबदारी पाटील यांच्याकडे सोपवली आहे.

या निवडणुकीत भाजप विरुद्ध बहुजन विकास आघाडी असा थेट सामना रंगला होता. भाजपने ४३ जागा जिंकून महापालिकेत सक्षम विरोधी पक्ष म्हणून स्थान मिळवले आहे. वसई–नालासोपारा येथील आमदार तसेच पालघरचे खासदार भाजपचेच असल्याने, महापालिका प्रशासनात विकासकामे करताना सत्ताधारी बविआला भाजपशी समन्वय साधणे अपरिहार्य ठरणार आहे. अजीव पाटील हे मनमिळावू व अनुभवी नेते असल्याने ते विरोधकांशी संवाद राखून महापालिकेचे कामकाज सुरळीत चालवतील, असा विश्वास आघाडीच्या नेतृत्वाने व्यक्त केला आहे.

उमेदवारी अर्ज दाखल

उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी राजकीय घडामोडींना वेग आला. बहुजन विकास आघाडीतर्फे महापौरपदासाठी अजीव पाटील आणि प्रफुल्ल साने, तर उपमहापौरपदासाठी मार्शल लोपीस व कन्हैया भोईर यांनी नामांकन सादर केले. दुसरीकडे भाजपतर्फे महापौरपदासाठी ॲड. दर्शना त्रिपाठी, तर उपमहापौरपदासाठी सुरेश मांजरेकर यांनी अर्ज दाखल केले आहेत.

'नाना' फॅक्टर चर्चेत

निवडणुकीनंतर वसई–विरारमध्ये 'आता कसं, नाना सांगतील तसं' असा मजकूर असलेले बॅनर्स मोठ्या प्रमाणावर झळकले होते. येथे 'नाना' म्हणजे महापालिकेचे पहिले महापौर राजीव पाटील. अजीव पाटील हे त्यांचेच बंधू आहेत. राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, राजीव पाटील यांच्या अनुभवाचा लाभ मिळावा आणि सत्तेची घडी अधिक मजबूत व्हावी, यासाठी हितेंद्र ठाकूर यांनी अजीव पाटील यांच्या माध्यमातून एका दगडात अनेक पक्षी मारल्याची रणनीती आखली आहे.

भाजपने आपले उमेदवार रिंगणात उतरवल्याने निवडणूक औपचारिकरीत्या रंगतदार ठरणार असली, तरी बहुजन विकास आघाडीकडे स्पष्ट बहुमत असल्याने दि. ३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतदानात अजीव पाटील हेच वसई–विरारचे नवे महापौर म्हणून विराजमान होतील, हे आता जवळपास निश्चित मानले जात आहे.

# भारतीय ख्रिश्चन संताला जपानमध्ये क्रुसावर का चढवलं गेलं? या मराठी संताबद्दल तुम्हाला माहिती आहे का?

आता या गोष्टीला साडेचारशे वर्षांपेक्षा जास्त काळ उलटून गेलाय. पोर्तुगीजांचे पाय भारताच्या पश्चिम किनाऱ्याला लागूनही अनेक वर्षं लोटली होती.

वास्को द गामा १४९८ साली कालिकतमध्ये आला त्यानंतर पोर्तुगीजांनी व्यापार आणि धर्मप्रसारासाठी महत्त्वाच्या जागा हेरायला सुरुवात केली.

१५१० साली अल्फान्सो दि अल्बुकर्क गोव्यात आला आणि त्यांचं लक्ष आणखी उत्तरेकडच्या प्रदेशांत जायला लागलं.

लवकरच पोर्तुगीजांची इच्छा पूर्ण झाली. १५१३ मध्ये पोर्तुगीजांना रेवदंड्यात लहानसा किल्ला बांधायची परवानगी मिळाली. मग ठाणे कल्याण, तारापूर अशा गावांवर त्यांची नजर गेली. त्यातच वसईत आधीच असलेल्या लहानशा किल्लेवजा जागेवर त्यांचा डोळा होताच.

थोड्याच काळात म्हणजे १५३३ मध्ये पोर्तुगीजांनी वसईच्या आजच्या किल्ल्याची जागा जिंकली आणि आपले पाय पुढच्या दोनशे वर्षांसाठी भक्कमपणे रोवले.या रोवलेल्या पायांनी महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल बदललाच पण महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सांस्कृतिक प्रवाहातही मोठे बदल झाले.

बहुसांस्कृतिक अशा महाराष्ट्राच्या ओळखीत एक नवा धर्म आणि संस्कृती, भाषा समाविष्ट झाली. यात कधी युद्ध, धाकदपटशाही आणि बळजबरीचेही प्रसंग आले हे नाकारता येत नाही.

वसईला महत्त्व का आलं?

वसई हे शहर मुंबईपासून उत्तरेस साधारण ५० किमी अंतरावर आहे. एकेकाळी ठाणे जिल्ह्यात असणारं हे शहर आता पालघर जिल्ह्यातलं एक महत्त्वाचं शहर म्हणून ओळखलं जातं. त्याला ब्रिटिश काळात बॅसिन, बेसिन अशा नावानं ओळखलं जात होतं.पोर्तुगीजांनी इथं कसे पाय रोवले याची माहिती घेणं आवश्यक आहे. पोर्तुगीजांच्या भारतातील उत्तरेतील प्रांताचं नाव प्रोविन्सिया दो नोर्टे असं होतं.

यामध्ये उत्तरेस दमण ते दक्षिणेस करंजा असा साधारण २०० किलोमीटरचा प्रांत येत होता. त्यात दीव बेट आणि चौलही येत होते. हा भाग त्यापूर्वी गुजरात आणि अहमदनगरच्या (अहमदनगरची निजामशाही) राज्यात होता.

या त्यांच्या प्रांताची वसई ही राजधानी होती. गुजरातच्या सुलतानाने मुघलांशी लढण्यासाठी मदत मागताना वसईचा ताबा पोर्तुगीजांना दिला आणि इथं पोर्तुगीजांनी दीर्घकाळ आपला ताबा ठेवला.वसईच्या किल्ल्याचे अभ्यासक श्रीदत्त राऊत यांच्यामते मात्र या किल्ल्याचा असा गुजरातच्या सुलतानाचा थेट संबंध असल्याचा पुरावा सापडत नाही.

ते सांगतात, 'हा किल्ला १२ व्या शतकात भोंगळे राजांनी बांधला असे उल्लेख आणि पुरावे सापडतात. त्यावेळेस बालेकिल्ला आणि काही बांधकामं झाली होती, ती आजही दिसून येतात.'

गुजरातच्या सुलतानाच्या काळात झालेलं थोडंफार बांधकाम पोर्तुगीजांच्या काळात वेगानं वाढलं. किल्ल्याला आतून बाहेरून रुप देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बांधकामांना सुरुवात झाली.आतमध्ये बालेकिल्ला, चर्चेस, इमारती, राहाण्याच्या जागा, बाहेर बुरुज असलेली मोठी तटबंदी असं बांधकाम पोर्तुगीजांनी वेगानं करायला सुरुवात केली.

वसईच्या किल्ल्याचा प्रदेश एखाद्या बेटासारखा आहे. पश्चिमेला अरबी समुद्र आहे. दक्षिण आणि नैऋत्येला उल्हास नदी ज्याला वसईची खाडी असंही म्हटलं जातं. आणि त्याचाच एक फाटा पूर्वेला होता. तो सर्व भाग आता गाळाने भरलेला दिसून येतो. अशाप्रकारे जमिनिशी जोडलेला पण पाण्याने वेढलेला या किल्ल्यात पोर्तुगीजांनी एका शहरासारखी व्यवस्था तयार केली होती.

त्यांनी १५३६ पासून १७३९ पर्यंत किल्ल्यावर घट्ट पकड ठेवली आणि त्यानंतर तो मराठी साम्राज्यात सामील झाला.वसईचा किल्ला

पोर्तुगीजांनी १५३६ साली हे शहर वसवलं आणि इथली सगळी बांधकामं केली होती. महाराष्ट्रात राहणाऱ्या आणि भारतातील किल्ल्यांवर प्रेम असणाऱ्या व्यक्तीला वसई हे नाव माहिती नसणं विरळाच. महाराष्ट्राच्या समुद्र किनाऱ्यावर असणाऱ्या वसईचा किल्ला गेल्या चारशेहून अधिक वर्षांच्या इतिहासाचा साक्षीदार आहे.

वसईचा किल्ला हा व्यापाराच्या नावाखाली पोर्तुगीजांनी भारतात किती बळकटपणे पाय रोवले होते आणि त्यांना तिथून उखडून टाकण्यासाठी मराठी सत्ता तितकीच कशी सामर्थ्यवान होती याचं उदाहरण म्हणावं लागेल.

वसईचा किल्ला पोर्तुगीजांविरोधात चिमाजी अप्पांनी केलेल्या मोहिमेमुळे इतिहासात प्रसिद्ध झालाच त्याहून वसईची मोहीम, वसईची लढाई या नावाने त्याला विशेष स्थान मिळालं.हे स्थान पोर्तुगीजांच्या महाराष्ट्रातल्या कोर्लई, चौलसारख्या किल्ल्यांना मिळालेलं नाही.या किल्ल्याचं महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे भरपूर बुरुज असलेली याची भक्कम तटबंदी. या किल्ल्याला दोन दरवाजे असून त्यातला एक दरवाजा मुख्य भूमीच्या दिशेने आणि दुसरा खाडीच्या दिशेने उघडतो. साओ सेबेस्टिओ, साओ पाअलो, साओ पेद्रो, सेंट फ्रान्सिस झेवियर अशा प्रकारचे अनेक बुरुज या किल्ल्याच्या कोटाला आहेत.

या किल्ल्यात तीन चर्चेस आणि जेसुईटांच्या अध्ययनासाठी कॉलेजही होतं. आतमध्ये रस्ते आणि वस्त्यांची विशेष रचना करण्यात आली होती. किल्ल्यातच एक तुरुंग आणि कोर्टही होतं.

या किल्ल्यात बाजारपेठ वसवण्यात आली होती तसेच वज्रेश्वरी मंदिरही आहे. पेशव्यांनी किल्ल्यावर ताबा मिळवल्यावर बुरुजांची नावं बदलण्यात आली होती.यशवंत, कल्याण, भवानी मार्तंड, वेताळ, दर्या अशी बुरुजांची नावं ठेवण्यात आली होती. अशाप्रकारे वसई किल्ला हे बालेकिल्ल्याच्या भोवती वसलेलं एक शहरच तयार झालं होतं.

पोर्तुगीजांच्या काळात याच्या बालेकिल्ल्याला 'फोर्टे दे साओ सेबॅस्टिओ' असं नाव होतं.

ही जागा किल्ल्याच्या साधारण मध्यभागी आहे. सुमारे ३ किलोमीटर लांबीच्या तटबंदीवर असलेल्या १० बुरुजांद्वारे किल्ल्याचं रक्षण होत असे.

मराठ्यांनी किल्ल्यावर ताबा मिळवल्यावर १७३९ पासून मराठा साम्राज्य असेपर्यंत म्हणजे १८१८ पर्यंत किल्ल्यावर त्यांचंच राज्य होतं. त्यानंतर ब्रिटिशांच्या काळात त्याकडे फार लक्ष देण्यात आलं नाही. इंग्रजांनी किल्ला भाडेतत्वाने कारखान्यासाठी दिला. मात्र या काळात पडझड सुरूच राहिली. पोर्तुगीजांच्या काळात मोठ्या प्रमाणात इथं बांधकामं झाल्यामुळे एवढी पडझड होऊनही या इमारतींचे अवशेष दिसून येतात.

ब्रिटिशांनी लिटिलवूड नावाच्या व्यक्तीला साखर कारखान्यासाठी हा किल्ला दिला. मात्र अपेक्षित पैसा न मिळाल्यामुळे कर्जबाजारी झालेल्या लिटिलवूडने किल्ल्यातले दगड विकून पैसे उभारायला सुरुवात केली. ब्रिटिशांच्या काळात मुंबईत मोठी बांधकामं होत होती. या बांधकामांसाठीही किल्ल्याचे दगड वापरले गेले.वसईसारखं मोठं ठाणं हाती आल्यावर पोर्तुगीज राजांनी त्याला शहराचा दर्जा दिला. किल्ल्यामध्ये नगरपालिका, वस्त्या, रुग्णालय, शाळा, कॉलेज, चर्चेसची बांधणी करुन बस्तान बसवलं.

पोर्तुगीज वसाहतीतल्या श्रीमंत माणसांना फिदाल्गो दि वसई म्हणजे वसईचा उमराव असं संबोधलं जाऊ लागलं. एकदा आर्थिक आणि राजकीय सत्ता स्थापन झाल्यावर धर्मप्रसारासाठी पावलं उचलायला सुरुवात केली.

किल्ल्यामध्ये फ्रान्सिस्कन, जेसुईट, डॉमिनिकन, ऑगस्टिनियन, हॉस्पिटॅलर्स अशा धार्मिक संघटनांनी आपापली चर्चेस उभी केली. यामुळेच अनेक स्थानिक लोकही ख्रिश्चन झाले किंवा पोर्तुगीज आणि स्थानिक महिलांचे विवाह झाले.गोन्सालो गासिया

याच पोर्तुगीज सैनिक आणि स्थानिक महिलांच्या विवाह पद्धतीतून अनेक नव्या नागरिकांचा जन्म झाला. यात समावेश होता गोन्सालो गासिया यांचा.

गोन्सालो गासिया यांचा जन्म १५५७ साली वसईजवळच्या आगाशी इथं झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गासिया होतं आणि आईला कनारिना किंवा कनारिसे असं संबोधलं जायचं असं डॉ. रजीन डिसिल्वा आपल्या 'गाथा वसईच्या सुपुत्राची' या पुस्तकात लिहितात.

डॉ. डिसिल्वा हे इतिहास अभ्यासक असून वसईच्या गोन्सालो गासिया महाविद्यालयाचे ते माजी प्राचार्य आहेत.डॉ. रजीन यांच्यामते त्याकाळी पोर्तुगीजांनी स्थानिक महिलांशी विवाह करण्यासाठी सैनिकांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे पोर्तुगीज राजवटीच्या सुरुवातीच्या काळामध्ये गोवा, चौल, वसई, दीव, दमण या वसाहतींमध्ये असे विवाह झाले.

असं लग्न केल्यामुळे त्यांच्या आईवडिलांना किल्ल्यात राहायची संधी मिळाली आणि सैनिकी पेशा सोडून दुसरा व्यवसाय करण्याची मुभा मिळाली. त्यामुळे गोन्सालो गासियाचं बालपण किल्ल्यातच गेलं.

आईवडिलांचं छत्र लवकरच हरपलं तरी त्यांना जेसुईटांच्या मठात राहाण्याची संधी मिळाली. इथंच त्यांना सेबॅस्टियन गोन्सालिव्स यांच्यासारखे गुरू मिळाले आणि ते अल्तार बॉय म्हणून काम करू लागले.

जपानला जाण्याची संधी

अशाप्रकारे जेसुईटांबरोबर धर्मशिक्षणाला सुरुवात केलेल्या गोन्सालो गासिया यांना वेगवेगळ्या भाषा शिकण्याची संधी मिळाली.अशाप्रकारे जेसुईटांबरोबर धर्मशिक्षणाला सुरुवात केलेल्या गोन्सालो गासिया यांना वेगवेगळ्या भाषा शिकण्याची संधी मिळाली.

स्थानिक मराठी, कोकणीबरोबर पोर्तुगीज, लॅटिन भाषा त्यांनी आत्मसात केल्या. थोड्या वर्षांतर मिशनऱ्यांनी जपान आणि पूर्व आशियात धर्मप्रसाराला जायचं ठरवल्यावर गोन्सालो गासिया यांना अगदी अल्पवयात जपानला जायची संधी मिळाली. त्यामुळे त्यांनी जपानी भाषाही शिकून घेतली.

जपानला गेल्यावर मिशनबरोबर गरिबांना मदत करायचं काम त्यांनी सुरू ठेवलं. मात्र तिथं धर्मशिक्षक म्हणून काम करत असताना त्यांना धर्मगुरू म्हणजे फादर व्हायची इच्छा होती.पण ते युरोपियन वंशाचे नसल्यामुळे त्यांना ती संधी नाकारण्यात आली. त्यामुळे गोन्सालो यांच्या उत्साहावर अचानक पाणी पडलं. त्यांनी जेसुईट संघाला निरोप दिला आणि ते थेट व्यापारी झाले. फिलिपाईन्समध्ये व्यापाराला सुरुवात करुन त्यांनी आपलं मन रिझवण्याचा प्रयत्न केला.

मात्र काही काळातच जपानचा तेव्हाचा राजा सम्राट हिदौशीने मिशनऱ्यांना जपानमध्ये आमंत्रित केलं. त्यामध्ये गोन्सालो यांचा समावेश होता.

सुरुवातीच्या काळात हिदौशीनं या सर्वांना चांगला पाठिंबा दिला. त्यामुळे जपानमध्ये परतल्यावर गोन्सालो यांनी कुष्ठरोग्यांना मदत, अनाथाश्रमात काम करुन जोमानं प्रयत्न सुरू केले. त्याचप्रमाणे धर्मप्रसाराचं कामही वेगानं सुरू केलं. यावेळेस ते फ्रान्सिस्कन मठात काम करत होते. अशाप्रकारे भारतीय वंशाची पहिली व्यक्ती जपानमध्ये मिशनरी म्हणून काम करू लागली.वारं फिरलं, तारुण्यातच शिक्षा

असं असलं तरी ही हिदौशीचं हे पाठबळ फारकाळ टिकलं नाही. स्थानिक धर्मातल्या लोकांना आणि त्यांच्या धर्मगुरूंना हे बाहेरचे लोक आल्यामुळे जपानवर संकटं येत आहेत असं सांगण्याचं कारण मिळालं.जपानमध्ये धूळ आणि पावसाचा लाल पाऊस पडला, भूकंप झाला की या मिशनऱ्यांना दोषी ठरवलं जाऊ लागलं. हळूहळू या मिशनऱ्यांच्याविरोधात वातावरण तयार करण्यात आलं. हिदौशीच्या कानावरही या तक्रारी घालण्यात आल्या. हे लोक धर्मप्रसाराबरोर छळ करतात असा समजही हिदौशीचा झाला. याचा परिणाम म्हणून शेवटी या मिशनऱ्यांना शत्रू ठरवून त्यांना मारण्याचा आदेश त्यानं दिला.

यामुळेच ५ फेब्रुवारी १५९७ रोजी गोन्सालो यांच्यासह त्यांच्या २५ सहकाऱ्यांना क्रुसावर चढवून मारण्यात आलं. नागासाकीच्या ज्या टेकडीवर ही शिक्षा देण्यात आली त्याला कालांतरानं तीर्थस्थळाचं रूप आलं.संतपद

१५९७ साली क्रुसावर चढवलेल्या गोन्सालो गासिया यांना संत म्हणून घोषणा करायला मात्र दोन शतकं केली. १८६२ साली पोप नववे पायस यांनी गोन्सालो आणि त्यांच्या २५ सहकाऱ्यांना संतपद घोषित केलं.

इतिहास अभ्यासक प्रशांत घरत बीबीसी मराठीशी बोलताना म्हणाले, 'संत गोन्सालो गासिया हे एक इतिहास, श्रद्धा आणि भूगोल एकत्र आणणारं दुर्मिळ व्यक्तिमत्व आहे.''भारतीय ख्रिस्ती इतिहासात संत गोन्सालो गासिया यांचे स्थान अनन्यसाधारण आहे, कारण ते भारतीय वंशातील पहिले संत मानले जातात. भारतातील ख्रिस्ती धर्म त्या काळी युरोपीय सत्तांसोबत घट्ट जोडलेला असताना, त्यांच्या आयुष्याने दाखवून दिले की हा धर्म स्थानिक पातळीवरही रुजला होता. पुढे त्यांनी फ्रान्सिस्कन संघात प्रवेश घेतला आणि जपानमध्ये शहीद झाले, ज्यामुळे त्यांच्या कहाणीला व्यापक, जागतिक आयाम मिळाला. ते १६व्या शतकात निधन पावले असले तरी त्यांचे संतपद घोषित होणे बऱ्याच उशिरा झाले. त्यामुळे त्यांच्या आयुष्याच्या दीर्घकालीन प्रभावाचा अंदाज येतो.'

वसईनं जपली आठवण

जपानमध्ये मृत्यूदंड दिलेल्या या वसईच्या संताची ओळख वसईकरांनी मात्र आजही जपली आहे. वसईच्या गोन्सालो गासिया महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या प्राध्यापिका ट्रिझा परेरा याबद्दल अधिक माहिती देतात. 'वसईच्या किल्ल्यात एक मोठे चर्च १५४९ साली बांधलं गेलं. हे चर्च नंतर गोन्सालो गासिया यांना समर्पित करण्यात आलं. गोन्सालो यांच्या आयुष्यातली आठ वर्षं याच किल्ल्यात गेली होती. त्यांच्या नावानं हे चर्च आजही उभं आहे. त्याचप्रमाणे बऱ्हामपूर, गास या वसईजवळच्या गावांमध्ये त्यांच्या नावाने चर्चेस उभी केलेली आहेत. तसेच अनाथालय आणि शाळाही चालवली जाते. त्यांच्याच नावानं वसईत आज गोन्सालो गासिया महाविद्यालय उभं आहे, तिथं गोन्सालोंची स्मृति जपत हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गोन्सालो यांच्या आगाशीतल्या मूळघराचं स्मारक होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.'

# वाढवण विमानतळाची घोषणा हवेतच?

## राज्याकडून प्रस्तावच नाही; केंद्रीय नागरी उड्डाण मंत्र्यांची संसदेत माहिती

मुंबई/पालघर : पालघर जिल्ह्यात वाढवण बंदराजवळ समुद्रात तरंगते विमानतळ उभारण्याची घोषणा काही महिन्यांपूर्वी राज्य सरकारकडून करण्यात आली होती. मात्र या विमानतळासाठी आवश्यक असलेला कोणताही ठोस प्रस्ताव अद्याप केंद्र सरकारकडे पाठवण्यात आलेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे राज्य सरकारची ही घोषणा केवळ हवेतच होती का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी वाढवण येथील प्रस्तावित विमानतळाच्या प्रकल्प मंजुरी (साइट क्लिअरन्स) आणि या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छीमारांच्या प्रश्नांबाबत दोन दिवसांपूर्वी संसदेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राममोहन नायडू यांनी लेखी उत्तर देत वस्तुस्थिती स्पष्ट केली.केंद्रीय मंत्र्यांनी दिलेल्या उत्तरानुसार, ग्रीनफिल्ड विमानतळ धोरणानुसार राज्य सरकारने विमानतळासाठी जागा निश्चित करून प्रस्ताव पाठविल्यानंतरच केंद्राकडून प्रकल्प मंजुरीची प्रक्रिया सुरू होते. मात्र पालघर जिल्ह्यात वाढवण येथील प्रस्तावित विमानतळासाठी अद्याप जागा निश्चित करण्यात आलेली नसून, तसा कोणताही प्रस्ताव केंद्र सरकारकडे प्राप्त झालेला नाही. त्यामुळे प्रकल्प मंजुरीचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.राज्यावर जबाबदारी

विमानतळाची घोषणा केल्यानंतर जागा निश्चित करून केंद्राकडे प्रस्ताव सादर करणे ही राज्य सरकारची जबाबदारी असल्याचेही या उत्तरातून अधोरेखित झाले आहे. विमानतळ उभारणीदरम्यान बाधित होणाऱ्या मच्छीमारांच्या समस्यांबाबतही संसदेत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.

'विमानतळाची घोषणा केल्यानंतर जागा निश्चित करून प्रस्ताव देण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. तसेच, विमानतळ उभारताना बाधित मच्छीमारांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे,'

— डॉ. हेमंत विष्णू सवरा, खासदार, पालघर

श्वेतपत्रिकेची मागणीदरम्यान, वाढवण बंदर विरोधी संघर्ष कृती समितीनेही राज्य सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.'प्रस्तावित विमानतळाबाबत राज्य सरकारने केंद्राला नेमकी काय माहिती दिली आहे, यावर श्वेतपत्रिका काढावी. राज्य सरकारची भूमिका आणि संसदेत केंद्रीय मंत्र्यांनी दिलेले उत्तर यामध्ये तफावत का आहे, हे स्पष्ट केले पाहिजे,'

— वैभव वझे, सचिव, वाढवण बंदर विरोधी संघर्ष कृती समितीकेंद्राकडे कोणताही प्रस्ताव नसल्याचे संसदेत स्पष्ट झाल्याने वाढवण विमानतळाचा प्रस्ताव सध्या तरी केवळ घोषणांच्या पातळीवरच असल्याचे उघड झाले आहे.

### पत्नी नगरसेविका, पती कारभारी? लुडबुड महागात; पद जाण्याचा इशारा!

# महिला आरक्षणाचा गैरवापर रोखण्यासाठी शासन-न्यायालयांचा कठोर निर्णय

नालासोपारा : स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला आरक्षणामुळे महिलांना प्रतिनिधित्व मिळत असले, तरी प्रत्यक्ष कारभार पती किंवा नातेवाइकांकडून चालवला जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर महिला आरक्षणाचा मूळ उद्देश प्रत्यक्षात उतरवण्यासाठी शासन आणि न्यायपालिकेने कडक भूमिका घेतली आहे. नगरसेविका, सरपंच, नगराध्यक्षा किंवा महापौर यांच्या कामकाजात पती किंवा जवळच्या नातेवाइकांचा थेट अथवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप आढळल्यास संबंधित महिला लोकप्रतिनिधी अपात्र ठरू शकते, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.



महिला आरक्षण असलेल्या जागांवर निवडून आलेल्या अनेक ठिकाणी प्रत्यक्ष सत्ता पती किंवा नातेवाइकांच्या हातात असल्याचे चित्र आहे. प्रशासनाशी पत्रव्यवहार, अधिकाऱ्यांशी संपर्क, विकासकामांचे निर्देश देण्यापर्यंतची सूत्रे अनेक ठिकाणी 'पतीराज'कडे असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने स्पष्ट आदेश जारी करत कारवाईचे संकेत दिले आहेत.

हस्तक्षेप सिद्ध झाला तर पद धोक्यात

नगरसेविकेऐवजी तिच्या पतीने किंवा नातेवाइकांनी महापालिकेच्या कामकाजात हस्तक्षेप केल्याचे सिद्ध झाल्यास कायद्यानुसार नगरसेविकेचे पद रद्द होऊ शकते. इतकेच नव्हे, तर पुढील निवडणूक लढवण्यावरही अपात्रतेची टांगती तलवार राहणार आहे.

कायदा काय सांगतो?

महानगरपालिका अधिनियम व राज्य शासनाच्या आदेशानुसार, निवडून आलेला लोकप्रतिनिधीच सर्व अधिकार वापरण्यास पात्र आहे. प्रतिनिधीच्या नावावर इतर कोणीही कारभार चालवणे हा कायद्याचा भंग मानला जाणार आहे.

महिलांचे प्रतिनिधित्व वाढवणे हा उद्देश

पान नं.२वर

# कामगारांचा विश्वास – युवाशक्ती कामगार संघटना

(श्रमिक संघ अधिनियम, १९२६ अंतर्गत नोंदणीकृत)

नोंदणी क्र. : काउआ/पीएएल/व्हि/०९/२०२६

**कामगारांचे कायदेशीर हक्क, न्याय आणि सन्मान अबाधित राहावेत यासाठी कार्यरत संघटना.**

**वेतन, सेवा अटी, कंत्राटी कामगार प्रश्न, अन्यायाविरोधात कायद्याच्या चौकटीत मार्गदर्शन व पाठपुरावा.**

अध्यक्ष : रुबिना मुल्ला

कार्याध्यक्ष : तुषार आर. गायकवाड

contact/9890879757-

Email-yuvashaktikamgarsanghatana@gmail.com







## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ में. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८

या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in